# तुळापुरातील पार्टीत पबमधील मद्यसाठा

## कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव

**पुणे :** तुळापुरातील 'प्रोजेक्ट एक्स' पार्टीत राजा बहादूर मिल परिसरातील एका पबमधून मद्यसाठा पुरविण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. मद्याची विक्रीचा परवाना पबमधील जागेपुरता मर्यादित असताना अन्य ठिकाणी तो पाठविण्यात आला. या प्रकरणात संबंधित पबविरुद्ध कारवाई करण्याचा प्रस्ताव राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे.

तुळापुरातील एका बंगल्यात आयोजित करण्यात आलेल्या पार्टीवर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने छापा टाकला. या पार्टीला रात्री साडेअकरापर्यंत परवानगी होती. मात्र, ही पार्टी पहाटेपर्यंत सुरू होती. या पार्टीतून पोलिसांनी मद्यसाठा, तीन ग्रॅम गांजा, अन्य मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी पार्टीच्या आयोजकांसह ७८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या पार्टीच्या आयोजनात राजा बहादूर मिल परिसरातील पबमालकाचा सहभाग असल्याचे उघडकीस आले. तपासात राज्य उत्पादन शुल्क विभागाने मद्यसाठ्याबाबत चौकशी केली. मद्य वितरण नोंदीची माहिती घेतल्यानंतर संबंधित मद्यसाठाविक्रीची परवानगी पबला देण्यात आली. पबमधील मद्यसाठा टेम्पोतून तुळापुरातील पार्टीच्या ठिकाणी नेण्यात आल्याचे उघडकीस आले. परवान्यातील अटींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून संबंधित पबविरुद्ध कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे पाठविला आहे.

या बाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल कानडे म्हणाले, 'संबंधित पबला मद्य विक्री, वितरणाची परवानगी संबंधित जागेपुरती दिली होती. मात्र, पबमधील मद्यसाठा अन्य ठिकाणी नेण्यात आला. नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.' जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रस्तावानुसार कारवाई केल्यास ती दंडात्मक स्वरुपात केली जाऊ शकते.

## ओमराजे निंबाळकरांच्या निवासस्थानी बंदोबस्त

**पुणे :** धाराशिवचे शिवसेनेचे (ठाकरे गट) खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केल्यानंतर त्यांच्या पुण्यातील निवासस्थानाच्या परिसरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. 'निंबाळकर यांना 'वाय प्लस' दर्जाची सुरक्षा आहे. त्यांच्या निवासस्थानी एक अधिकारी, पाच कर्मचारी असा बंदोबस्त दिवसा आणि रात्री तैनात केला जातो.

शवसेना (ठाकरे गट) खासदार निंबाळकर यांनी शिवसेना (शिंदे गट) प्रवेश केला. त्यानंतर त्यांच्या निवासस्थानी असलेल्या पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली', अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली. निंबाळकर यांच्या निवासस्थानी पोलीस वाहन तैनात करण्यात आले आहे. 'पुढील सात दिवस त्यांच्या निवासस्थानी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला जाणार असून, पुढील गरज विचारात घेऊन बंदोबस्ताबाबत निर्णय घेण्यात येणार आहे', असे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी नमूद केले.

# ताथवडेत पिंपरी पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय

## २० हेक्टरचा भूखंड देण्यास महसूलमंत्र्यांची मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय शहराचा मध्यवर्ती भाग असलेल्या ताथवडेत होणार आहे. मुख्यालयासाठी ताथवडे येथील वळूमाता केंद्र येथील २० हेक्टर जागा देण्यास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मान्यता दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अंतिम मान्यतेनंतर येत्या दोन दिवसांत शासन निर्णय घेण्यात येणार आहे.

राज्य शासनाने १५ ऑगस्ट २०१८ रोजी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला मंजुरी दिली. त्या वेळी चिंचवड येथे महापालिका शाळेच्या इमारतीत आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले. निगडी येथील शाळेत मुख्यालय थाटण्यात आले. मोशी येथील नऊ एकर जागा आयुक्तालयासाठी मिळाली. मात्र, मुख्यालयासाठी जागेची मागणी कायम होती. साडेसात वर्षांपासून पोलीस आयुक्त कार्यालय, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने, मुख्यालय, इतर अनुषंगिक कार्यालयासाठी स्वतंत्र जागा नव्हती. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात मोठ्या प्रमाणात अडचणी येत होत्या. राज्याच्या पशुसंवर्धन व विकास विभागाचे ताथवडे येथे वळूमाता केंद्र आहे. या केंद्रातील २० हेक्टर जागा शहरातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून पोलीस आयुक्तालयाने प्रस्तावित केली. त्याला राज्य शासनाने १० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तत्त्वतः मान्यता दिली.

पिंपरी - चिंचवड पोलीस मुख्यालयाच्या जागेसाठी आयुक्तालय प्रशासनाकडून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. आयुक्त विनयकुमार चौबे तसेच तत्कालीन पोलीस आयुक्तांनीही वरिष्ठ पातळीवर प्रयत्न केले. त्यामुळे श्वान पथक, देहू येथे पोलिसांचे विश्रामगृह, आयुक्तालय प्रशासकीय इमारतीसाठी मोशी येथे नऊ एकर जागा, पोलीस अधिकारी निवासस्थानासाठी कस्पटेवस्ती येथे १५ एकर जागा, तसेच पोलीस मुख्यालयासाठीही २० हेक्टर जागा मिळाली आहे.

### मुख्यालयात होणार १५ विभाग

पोलीस उपायुक्त मुख्यालय कार्यालय, सराव मैदान, पोलीस भरती मैदान, श्वान पथक, मोटार परिवहन विभाग, क्यूआरटीसाठी कार्यालय, पोलीस शस्त्रागार, पोलीस रुग्णालय, धावपट्टी मार्ग (रनिंग ट्रॅक) व आवश्यक क्रीडा सरावाची साधने, बॉम्बशोधक नाशक पथक इमारत, पोलीस पाल्यासाठी शाळा, आंतरराष्ट्रीय शुटिंग रेंज, पोलीस वसाहत, बहुउद्देशीय हॉल, बंदोबस्तावरील पोलिसांचे विश्रामस्थान आणि इतर अनुषंगिक अशी १५ कार्यालये ताथवडेत होणार आहेत.

पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयासाठी जागा देण्यास महसूलमंत्र्यांनी मान्यता दिली आहे. लवकरच शासन आदेश निघेल. आदेश निघाल्यानंतर तत्काळ जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही केली जाईल.
**– विनयकुमार चौबे,** पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड



भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिर परिसरात वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी पुणे महानगरपालिकेने येथील खासगी जागा ताब्यात घेऊन मंदिर परिसराचा विस्तार करण्यास सुरुवात केली आहे. छायाचित्र : पवन खेंगरे

# मिश्रासह साथीदारांची येरवडा कारागृहात रवानगी

## पीडित महिलेकडून १३३ पानी जबाब

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** दैवी अवतार असल्याची बतावणी करून उच्चशिक्षित महिलेवर अत्याचार करणाऱ्या कथित गुरू राधामोहन मिश्रा याच्यासह साथीदारांची सोमवारी येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या प्रकरणातील पीडित महिलेने तिच्या गुदरलेल्या प्रसंगाची माहिती १३३ पानांमधून पोलिसांना दिली आहे.

या प्रकरणात राधामोहन मिश्रा (वय ५९) याच्यासह स्वामी कंवल नयन (वय ५८) आणि सहा महिलांना खराडी पोलिसांनी अटक केली. लैंगिक अत्याचार, कट रचणे, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा, जादूटोणा अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मिश्राच्या आश्रमावर छापा टाकून तेथून १२ लॅपटॉप, एक टॅब, ११ मोबाइल संच, १९ हार्ड डिस्क, साडेसहा लाखांची रोकड, डीव्हीडी, २३ पेन ड्राइव्ह, दहा काडतुसे, १५ लाखांचे दागिने जप्त केले.

या प्रकरणातील पीडित महिलेने खराडी पोलिसांकडे पुरवणी जबाब दिला आहे. 'मिश्राने अत्याचार केले. महिला भक्तांसमोर तो अत्याचार करत होता. या प्रकरणातील आरोपी महिलांनी मिश्रा याला साथ दिली. आरोपी महिलांनी पीडित महिलेला मेणबत्तीचे चटके दिले. भोंदूने महिलेची संपत्ती स्वतःच्या नावावर करून घेतली' असे पीडित महिलेने जबाबात म्हटले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेनंतर समाजमाध्यमात चित्रफीत प्रसारित झाली. भोंदू मिश्रा याची भक्तांकडून आरती केली जात असल्याचे चित्रफितीत दिसून आले आहे. मिश्रा याचे पाय पाणी आणि दुधाने धुतले जात असून, 'चरणामृत' म्हणून ते भाविकांना दिल्याचे चित्रफितीतून दिसून आले आहे.

मिश्रा याने पीडित महिलेवर १७ वर्षे अत्याचार केले. महिलेच्या आई-वडिलांची त्याच्यावर श्रद्धा होती. दैवी अवतार असल्याचा दावा करुन त्याने महिलेवर अत्याचार केले होते. त्याच्या दुष्कृत्यात आश्रमातील महिलांनी साथ दिली होती. या प्रकरणात सहा महिलांना अटक करण्यात आली होती. खराडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### अटक करण्यात आलेल्या एका महिलेला दिलासा

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सहा महिलांनी पुणे पोलिसांनी चुकीच्या पद्धतने अटक केल्याचा आरोप करून मुंबई उच्च न्यायालयात 'हॅबिअस कॉर्पस' (बेकायदा अटक) याचिका दाखल केली. मुंबई उच्च न्यायालयात सोमवारी या याचिकेवर सुनावणी झाली. या प्रकरणात एका महिलेची अटक बेकायदा असल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट करून तिला दिलासा दिला. मात्र, अन्य महिलांची अटक ही कायद्याला धरुन असून, हे प्रकरण गंभीर असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

### सांकेतिक शब्दामुळे अडथळे

पोलिसांनी मिश्राच्या आश्रमातून पेन ड्राईव्ह, हार्ड डिस्क , लॅपटॉप अशा इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त केल्या आहेत. लॅपटॉप उघडताना सांकेतिक शब्दाचा (पासवर्ड) करावा लागतो. सांकेतिक शब्द मिळाल्यानंतर लॅपटॉप उघडता येईल. त्या माध्यमातून तपासाच्या दृष्टीने महत्वाची माहिती मिळेल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## 'स्वच्छ'मध्ये तीन कोटींच्या घोटाळ्याचा आरोप

**पुणे :** कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात आमदार हेमंत रासने यांच्या कल्पनेतून राबविण्यात आलेल्या घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याच्या पायलट प्रकल्पात घोटाळा झाल्याचा आरोप सोमवारी सर्वसाधारण सभेत करण्यात आला. कोणतीही टेंडर प्रक्रिया न राबविता 'स्वच्छ' संस्थेला ३ कोटी रुपयांचा प्रकल्प देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मोहिमेच्या धर्तीवर आमदार रासने यांनी स्वच्छ कसबा मोहीम राबविली. भाजपचे नगरसेवक कुणाल टिळक यांनी या प्रकल्पामुळे नेमके किती 'क्रॉनिक स्पॉट' कमी झाले आणि प्रत्यक्षात किती कचरा संकलन झाले, असा प्रश्न उपस्थित करून प्रशासनाकडून आकडेवारीची मागणी केली. या प्रकल्पासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. पहिल्या तीन महिन्यांसाठी १ कोटी ९ लाख रुपये संबंधित संस्थेला देण्यात आले. या प्रकल्पाला आणखी दोन महिन्यांची मुदतवाढदेखील देण्यात आली. मात्र, पाच महिने उलटूनही या कामाचे मूल्यमापन करण्यात आले नसल्याची कबुली प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिल्याने सभासदांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. 'जे मूल्यमापन पाच महिन्यांत झाले नाही, ते आठ दिवसांत ते कसे होणार,' असे कुणाल टिळक म्हणाले. नगरसेविका स्वरदा बापट यांनी 'स्वच्छ' संस्थेच्या शहरातील कामकाजावर प्रश्न उपस्थित करून ही संस्था प्रशासनाची एवढी लाडकी का, असा प्रश्न विचारला. या प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप त्यांनी केला.

---

## पुणे पीपल्स् को-ऑपरेटीव्ह बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट बँक)

मुख्य कार्यालय: पहिला मजला, प्लॉट नं. ४७७ व ४७८, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७.
फोन: ७०६६०५०९९९/७०६६०५१९९९

### जाहीर फेर-लिलावाने विक्रीची नोटीस

**''जशी आहे तशी, जेथे आहे तेथे'' या तत्वावर मिळकतीची विक्री**

ज्या अर्थी मी खाली सही करणार अधिकृत अधिकारी, **पुणे पीपल्स को-ऑप. बँक लि., पुणे** यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनन्शीयल अॅसेट्स् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (२००२ चा कायदा ५४ दि.१७.१२.२००२) च्या कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारात सदर कायद्याच्या कलम १३(२) अन्वये कर्जदार, जामीनदार व गहाणदार यांना मागणी नोटीस पाठवून संपूर्ण कर्ज रक्कम भरण्याची मागणी केली होती. आणि ज्या अर्थी **मे. मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे** यांच्याकडे **पुणे पीपल्स को-ऑप. बँक लि.,पुणे** यांनी सदर कायद्याच्या कलम १४ अन्वये दाखल केलेल्या फौजदारी किरकोळ **अर्ज क्र. १५८९/२०२५** च्या अर्जावर आदेश देवून **मे. कोर्ट कमिशनर पुणे** यांनी कर्जदार यांच्या सदर तारण मिळकतीचा ताबा घेऊन ते **पुणे पीपल्स को ऑप. बँकेचे** अधिकृत अधिकारी यांचेकडे सुपूर्त करण्यास सांगितले. त्यानुसार **मे. कोर्ट कमिशनर पुणे** यांनी सदर मिळकतीचा **प्रत्यक्ष ताबा** कायदेशीर मार्गाने **दि. १२.०६.२०२५** रोजी घेतला आहे. आणि ज्याअर्थी अधिकृत अधिकारी अजय राजपुत यांनी सदर सरफेसी कायदा २००२ मधील तरतुदीनुसार **मे. कोर्ट कमिशनर पुणे** यांचेकडून सदर मिळकतीचा **दिनांक १२.०६.२०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा स्विकारलेला** आहे. कर्जदाराने मागणी केल्यानुसार कर्जफेड केली नसल्याने खालील तारण मालमत्ता विकून बँकेच्या येणे रकमेची वसुली करणेचे ठरविले आहे.

**कर्जदार आणि जामिनदार यांचे नाव**

**१) मेसर्स साईदीप अॅग्रो फूड्स (भागीदारी संस्था), श्री. भागवत शंकर मांढरे (भागीदार), श्री. देवानंद निवृत्ती फडतरे (भागीदार), नोंदणीकृत पत्ता –** १९/ए, जय गणेश प्लाझा, इस्कॉन मंदिराजवळ, कात्रज कोंढवा रोड, पुणे ४११०४८. **पत्ता :–** गट क्र. १२, मौजे कोर्टी, ता– करमाळा, जिल्हा– सोलापूर, ४१३२०३

**२) श्री. धनंजय निवृत्ती फडतरे (जामीनदार), राहणार :–** मु. पोस्ट– कोरेगाव भीमा, फडतरे वस्ती, ता– शिरूर, जिल्हा– पुणे.

**३) श्री. राहुल महादेव मांढरे (जामीनदार), राहणार :–** सर्व्हे क्र. २३/१/१/१/४/१बी, ए ३०५, जिज्ञासा बिल्डिंग, आंबेगाव पठार, सूर्या चौक, पुणे ४११०४६.

**४) श्री. भागवत शंकर मांढरे (गहाणखतदार/जामीनदार), राहणार :–** मु. पो. सोरगण (पूर्व) पोस्ट– केडगाव, ता– करमाळा, जिल्हा– सोलापूर.

**५) श्री. देवानंद निवृत्ती फडतरे (गहाणखतदार/जामीनदार),राहणार :–** मु. पोस्ट– कोरेगाव भीमा, फडतरे वस्ती, ता. शिरुर, जिल्हा– पुणे.

| मिळकतीचे ठिकाण व तपशील | राखीव मूल्य | लिलाव दिनांक व वेळ |
|---|---|---|
| **उपनिबंधक ता. शिरुर आणि कोरेगाव भिमा ग्राम पंचायत आणि पंचायत समिती शिरुर, जिल्हा परिषद पुणे यांच्या हद्दीतील गाव कोरेगाव भिमा, ता. शिरुर, जि. पुणे येथील** गट क्र. ३८८ वरील बिगरशेती औद्योगिक जमीन. एकूण क्षेत्रफळ ०० हेक्टर ७६ आर म्हणजेच ७६०० चौ. मि. पैकी ०० हेक्टर ३८ आर. म्हणजेच ३८०० चौ. मि. ज्याचा महसूल रु. २ आणि ९४ पैसे आहे. **ज्यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे: पूर्वेस :** गट नं. ३८७, **दक्षिणेस:** अंतर्गत रस्ता आणि गट नं. ३८२. **पश्चिमेस :** गट नं. ३९५, **उत्तरेस:** गट नं. ३८९. | रु. १,१०,००,०००/– (रु. एक कोटी दहा लाख फक्त) | दि. १०.०७.२०२६, सकाळी १२:०० वा. |

**मालमत्ता पाहणीची तारीख: सोमवार, दि. ०६.०७.२०२६, सकाळी ११.०० ते दु. ०४.०० वा**

**मागणी नोटीशीतील रक्कम : दि. ३०.११.२०२४ रोजी कर्जबाकी रक्कम : रु. १,५९,८८,६१०.६५ अधिक पुढील व्याज व शुल्क इ.**

**नियम व अटी:**
(१) लिलावात भाग घेणाराने लिलावापूर्वी परत मिळणारे डिपॉझिट **रु. १,००,०००/– (रु. एक लाख फक्त)** तसेच परत न मिळणारी लिलाव प्रोसेसिंग चार्जेस रु.१०००/– बँकेच्या मुख्य कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. (२) लिलाव बँकेच्या **पेरुगेट शाखा, ११४९, सदाशिव पेठ, पेरुगेट पोलीस चौकी जवळ, पुणे ३०. येथे होईल.** (३) लिलाव मंजूर करणे, स्थगित करणे अथवा कोणतेही कारण न देता रद्द करणे इ. चे सर्व अधिकार अधिकृत अधिकारी यांचेकडे राखीव आहेत. (४) लिलाव मालमत्तेबाबत व लिलावाच्या अटी आणि शर्तीसाठी बँकेच्या मुख्य कार्यालयात संपर्क करावा. **(अजय राजपूत, ७७२२०५८३९२)** (५) लिलावधारकांनी फोटो ओळख पुरावा, जसे, आधार कार्ड/पॅन कार्ड साक्षांकित करुन लिलावाचे वेळी सादर करावेत.

**टीप: बँकेच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर अन्य बोजा नाही. मिळकत कर, एमएसईबी इ.बाबतची खातरजमा खरेदी घेवू इच्छिणाराने करावयाची आहे.**

अजय राजपूत
अधिकृत अधिकारी व उप सरव्यवस्थापक
पुणे पीपल्स को ऑप.बँक लि.,पुणे

स्थळ : पुणे
दिनांक : २३.०६.२०२६ (मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

---

## AUTHUM ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** 707, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉइंट, मुंबई- 21.
**फोन:** (022) 6747 2117, **फॅक्स:** (022) 6747 2118 **ई-मेल:** info@authum.com

### ताबा सूचना (सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8(2) नुसार)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ("एआयआयएल") (एनसीएलटी च्या दि. 10.05.2024 रोजी च्या आदेशानुसार रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (''आरसीएफएल'') मधून एआयआयएल मध्ये कर्ज व्यवसायाच्या विलगीकरणाच्या अनुषंगाने परिणामी कंपनी) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या [नियम 3] सह वाचलेल्या कलम 13 (12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत, खाली नमूद केलेले कर्जदार / सह-कर्जदार यांना मागणी सूचना पाठवली ज्यात त्यांना सूचनेमधील नमूद केलेल्या रकमेचा सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार / सह-कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार / सह-कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या सदर कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत निम्नस्वाक्षरीकारांनी खाली नमूद केलेल्या दिनांकास खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

कर्जदार / सह-कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ("एआयआयएल") यांच्या रकमेच्या भाराधीन असेल.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार यांचे लक्ष सदर अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतूदीकडे वेधण्यात येते.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र./कर्जदार/ सह-कर्जदार यांचे नाव | मागणी सूचना दिनांक | ताबा दिनांक/ ताबा स्थिती | मागणी सुचनेमधील रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1. | **कर्ज खाते क्र. RHHLPUN000052021** **अनिल बाळू भेगडे, सीमा अनिल भेगडे** | 04-07-2025 | 20-06-2026 **प्रत्यक्ष ताबा** | **रु. 52,86,028 /-** (रुपये बावन्न लाख शहाऐंशी हजार अठ्ठावीस फक्त) |
| | **मालमत्तेचे वर्णन:** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र - 606 सहावा मजला इमारत -ए2, युनिट क्र 606, कार्पेट क्षेत्रफळ 49.52 चौ मी, (533 चौ. फू.) संलग्न टेरेस क्षेत्रफळ 3/25 पिरॅमिड काउंटी गट क्र - 99(पी) भुकुम पुणे पुणे महाराष्ट्र- 412115 | | | |
| 2. | **कर्ज खाते क्र. RHHLRAI000007919** **शामराव आनंद काशीद, अमोल शामराव काशीद शकुंतला शामराव काशीद** | 10-02-2023 | 19-06-2026 **प्रत्यक्ष ताबा** | **रु. 32,09,159/-** (रुपये बत्तीस लाख नऊ हजार एकशे एकोणसाठ फक्त) |
| | **मालमत्तेचे वर्णन:** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 6, तिसरा मजला, ''शांती कॉर्नर'' स. क्र. 14/15/1/18/19, मोजमाप 413 चौ. फू., म्हणजे 38.38 चौ. मी. बिल्ड अप टेरेस म्हणजे 33.45 चौ. मी. पुणे महानगरपालिका हद्दीत, मौजे वडगाव बु., पुणे, उप निबंधक पुणे यांच्या अधिकारक्षेत्रात. (यापुढे 'अनुसूची मालमत्ता' म्हणून संदर्भित). | | | |

**दिनांक: 22.06.2026 / ठिकाण: पुणे** **प्राधिकृत अधिकारी, ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**

---

## पुणे महानगरपालिका, पुणे

### निविदा प्रकिया कक्ष - विद्युत विभाग
### निविदा जाहिरात - नविन कामे

अद्वितीय & Unique

**विक्री कालावधी दिनांक :-** २३-०६-२०२६ ते ०२-०७-२०२६ १४:३० दुपारी पर्यंत

**स्वीकृती दिनांक :-** २३-०६-२०२६ ते ०२-०७-२०२६ १४:३० दुपारी पर्यंत **तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :-** ०३-०७-२०२६ १५:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किमंत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रु | बयाणा रक्कम रु | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2026/43 | विद्युत | पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. १,२, आणि ३ मधील विविध इमारती, क्षेत्रिय कार्यालये, हॉस्पिटल आणि इतर ठिकाणी अमलेल्या वातानुकुलीत यंत्रणेची दुरुस्ती करणे. | रु. १३५९/- | रु. १७३६५१०/- | रु. १७३६५/- | १२ | **Mangal Martalekar** ७४४७४७२४१२ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/ शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृत सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रकियाच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रकिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न. पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि.)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/ आर.टी.जी.एस/ एन.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यानेत येणार आहे.

सही/-
**Suresh Pawar**
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

*जाहिरात क्र. १/२४९*
*दि. २२/०६/२०२६*

---

## ACRE अॅसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लि.

MAKING ASSETS WORK

**नोंदणीकृत कार्यालय :** 14वा मजला, इरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली - 110019. टेली. : 91-11-43115600 फॅक्स : 91-11-43115618.
**कॉर्पोरेट कार्यालय :** युनिट क्र. 502, सी विंग, वन बीकेसी, रेडियस डेव्हलपर्स, प्लॉट क्र. सी-66, जी-ब्लॉक वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - 400051. टेली. : 022 68643101 **ई-मेल: acre.arc@acreindia.in वेबसाइट: www.acreindia.in CIN : U65993DL2002PLC115769**

### परिशिष्ट IV - अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि 9(1) च्या तरतुदीसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या अचल मालमत्ता ज्या **अॅसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लिमिटेड [CIN : U65993DL2002PLC115769] ("सुरक्षित धनको")** यांच्याकडे तारण / भारग्रस्त असून, या मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकारयाने घेतला आहे, तसेच खालील कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांकडून सुरक्षित धनको यांना देय रकमेच्या वसुलीसाठी **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'तेथे जे काही आहे'** तत्वावर या मालमत्तांची विक्री करण्यात येईल, सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद केलेली राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव देय असेल.

**सुरक्षित मालमत्तेचा तपशील**

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. आणि एसीआरई ट्रस्टचे नाव | कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांचे नाव | 02 जून 2026 रोजी नुसार एकूण थकबाकी देय | राखीव किंमत | बयाणा रक्कम | डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी द्वारे ईएमडी भरण्यासाठी | लिलाव दिनांक आणि वेळ | बयाणा रक्कम दिनांक व वेळ | सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | पीडीएफ पाहण्यासाठी बारकोड स्कॅन करा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 101MSM001021686 एसीआरई 188 ट्रस्ट | शंतनू मोहन किंद्रे (कर्जदार) आशा मोहन किंद्रे (सह-कर्जदार), मोहन बाबुराव किंद्रे (सह-कर्जदार), विनायक बाबुराव किंद्रे (सह-कर्जदार) | रु. 4115680/- (रुपये एक्केचाळीस लाख पंधरा हजार सहाशे ऐंशी फक्त) सोबत भरणा आणि वसुलीच्या तारखेपर्यंत लागू होणारे व्याज, शुल्क आणि खर्च. | **रु. 20,55,000/- - (रुपये वीस लाख पंचावन्न हजार फक्त)** | **रु. 2,05,000/- (रुपये दोन लाख पाच हजार पाचशे फक्त)** | खात्याचे नाव : एसीआरई-188-ट्रस्ट खाते क्रमांक : 011050200043471 बँक : फेडरल बँक आयएफएससी : FDRL0001105 | **28 जुलै 2026 दु. 2.30 ते दु. 3.30** | **27 जुलै 2026 दु. 4:00 पर्यंत** | **सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट क्र. 401 "शिवप्रसाद" म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीच्या चौथ्या मजल्यावर, मोजमाप 805 चौ. फू. (74.79 चौ. मी. च्या समतुल्य) सोबत कार्पेट क्षेत्रफळ 671 चौ. फू., प्लॉट क्र. 132 संबंधित सिटी सर्व्हे क्र. 1739, मोजमाप 2,920 चौ. फू. (73 फू. X 40 फू.), गाव मौजे शिवणे (उत्तम नगर), तालुका हवेली येथे स्थित, उप-निबंधक हवेली क्र. 17/27 यांच्या अधिकारक्षेत्रात, पुणे, तहसीलदार हवेली, जिल्हा परिषद पुणे आणि पंचायत समिती हवेली, संबंधित ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 309/13. | |
| 2 | AFH000800176811 एसीआरई 166 ट्रस्ट | सूर्यकांत जगन्नाथ कदम (कर्जदार) संगिता सूर्यकांत कदम (सह-कर्जदार) | रु. 1688981/- (रुपये सोळा लाख अठ्ठ्याऐंशी हजार नऊशे एक्याऐंशी फक्त) सोबत भरणा आणि वसुलीच्या तारखेपर्यंत लागू होणारे व्याज, शुल्क आणि खर्च. | **रु. 11,52,000/- - (रुपये अकरा लाख बावन्न हजार फक्त)** | **रु. 1,15,200/- (रुपये एक लाख पंधरा हजार दोनशे फक्त)** | खात्याचे नाव : एसीआरई-166-ट्रस्ट खाते क्रमांक : 0901102000042112 बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : IBKL0000901 | **28 जुलै 2026 दु. 2.30 ते दु. 3.30** | **27 जुलै 2026 दु. 4:00 पर्यंत** | **सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :** युनिट क्र. ए6-519, मोजमाप 19.97 चौ. मी. (215 चौ. फू. च्या समतुल्य) कार्पेट क्षेत्रफळ, "एक्झर्बिया आंबी" या निवासी प्रकल्पातील "ए6" म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीच्या सहाव्या मजल्यावर स्थित, अकृषिक जमीन मोजमाप 04 हेक्टर्स 64.5 आर्स संबंधित गट क्र. 36, 37, 39, 40 आणि 339 यावर बांधलेले, गाव आंबी, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे स्थित. | |

1. ईएमडी पेमेंट डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी मार्फत, वर नमूद केलेल्या बँक खात्यांच्या नावे काढले / अदा केले जावे.

| | |
|---|---|
| **2. लिलावासाठी वेबसाईट** | **https://www.bankeauctions.com** |
| **3.संपर्क तपशील** | 1800-209-2989 / **auction.support@acreindia.in** |

**4. मालमत्तेची पाहणी केवळ पूर्व-नियोजित भेटीच्या परवानगी नुसार करता येईल.**

**5. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तीसाठी, कृपया www.acreindia.in / www.bankeauctions.com या वेबसाईटला भेट द्या.**

**दिनांक : 23/06/2026, ठिकाण : पुणे** **स्वा/- प्राधिकृत अधिकारी, अॅसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइज लिमिटेड**